तरुण भारत
# सदाफुली
https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com
बुधवार, ४ सप्टेंबर २०२४

आतील पानावर

पान २ – 'अद्भूत'मध्ये डायना पेंटी
पान ३ – विक्रांत मैसीच्या नव्या चित्रपटाची घोषणा
पान ४ – माझ्या आयुष्यात सध्या खूप नाती
पान ६ – अमृताचा नवीन चित्रपट येणार ...
पान ७ – श्वेताच्या फिटनेसवर सलमान 'फिदा'

# श्रद्धा कपूर बनली सर्वाधिक फॉलोवर्स असणारी सेलिब्रिटी

छत्रपती अभिनेत्री श्रद्धा कपूर ही बॉलिवूडमधील यशस्वी अभिनेत्रींपैकी एक आहे. श्रद्धा कपूर तिच्या नुकत्याच प्रदर्शित झालेल्या स्त्री २ चित्रपटाच्या यशानंतर सतत चर्चेत असते. अलीकडेच तिने इंस्टाग्राम फॉलोअर्सच्या बाबतीत पंतप्रधान नरेंद्र मोदींना मागे टाकले. पीएम मोदींनंतर श्रद्धा आता इंस्टाग्रामवर सर्वाधिक फॉलो होणारी दुसरी भारतीय बनली आहे. ९२ दशलक्ष इंस्टाग्राम फॉलोअर्ससह तिने ग्लोबल आयकॉन प्रियांका चोप्राला मागे टाकले आहे. स्त्री २ च्या यशानंतर श्रद्धा कपूरच्या फॉलोअर्समध्ये झपाट्याने वाढ झाली आहे. आतापर्यंत प्रियांका चोप्रा बॉलिवूड स्टार्समध्ये या बाबतीत आघाडीवर होती. मात्र आता श्रद्धाने त्याला मागे टाकत पहिल्या क्रमांकावर आपले स्थान निर्माण केले आहे. तसेच ती दुसऱ्या क्रमांकाची सर्वाधिक फॉलो करण्यात येणारी भारतीय सेलिब्रिटी बनली आहे. विराट कोहली २७० दशलक्ष फॉलोअर्ससह आघाडीवर आहे. 'स्त्री २' चित्रपट रिलीज होण्यापूर्वी श्रद्धा कपूरचे इंस्टाग्रामवर जवळपास ९० मिलियन फॉलोअर्स होते. मात्र चित्रपटगृहांमध्ये धडकल्यानंतर श्रद्धा कपूर सर्वत्र प्रसिद्ध झाली आहे. इंस्टाग्राम हँडलवर फॉलोअर्सचा पूर आला होता. या अभिनेत्रीने आधी देशाच्या पंतप्रधानांना आणि आता प्रियांका चोप्राचा पराभव केला आहे. इंस्टाग्रामवर सर्वाधिक फॉलोअर्स असलेल्या टॉप तीन भारतीय सेलिब्रिटींमध्ये विराट कोहली (२७० दशलक्ष) पहिल्या स्थानावर, श्रद्धा कपूर (९२ दशलक्ष) दुसऱ्या स्थानावर आणि प्रियांका चोप्रा (९१.८ दशलक्ष) तिसऱ्या स्थानावर आहे. स्त्री २ चित्रपटाबद्दल बोलायचे झाले तर अमर कौशिकच्या दिग्दर्शनाखाली बनलेला हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर कमाई करत आहे. या चित्रपटात श्रद्धा कपूर, राजकुमार राव, पंकज त्रिपाठी आणि अपारशक्ती खुराना सारखे दिग्गज कलाकार दिसले आहेत. १० दिवसांत चित्रपटाचे एकूण कलेक्शन ३४१.६५ कोटींवर पोहोचले आहे.





# श्रीमंत व्यक्तींच्या यादीत शाहरुख




यावर्षी हुरून इंडिया यांनी जगभरातील वेगवेगळ्या देशातील श्रीमंत व्यक्तींची यादी जाहीर केली आहे. त्यात भारतातील १५३९ लोकांचा समावेश आहे. भारतात क्षणाला १५३९ व्यक्तींकडे १ हजार कोटींपेक्षा जास्त संपत्ती आहे. त्यात २७२ व्यक्तींचा नव्याने समावेश झाला आहे. पाच वर्षात या यादीत ८६ टक्क्यांनी वाढ पाहायला मिळाली आहे. सगळ्यात महत्वाचं म्हणजे यात अभिनेता शाहरुख खान याचं नावही आहे. शाहरुख लोकप्रियतेमध्ये अनेक कलाकारांपेक्षा पुढे आहेच मात्र आता आता त्याने इतर कलाकारांना मागे टाकत सगळ्यात श्रीमंत कलाकार असण्याचा मान मिळवला आहे. वाचा एकूण किंग खानची संपत्ती किती आहे. भारतातील सगळ्यात श्रीमंत व्यक्तींच्या यादीत पहिल्या क्रमांकावर गौतम अदानी आहेत तर दुसऱ्या क्रमांकावर अंबानी आहे. पहिल्या १० नावांमध्ये देशभरातील बिझनेसमॅनचा समावेश आहे. तर शाहरुख ही या लिस्टमध्ये आला आहे. तो सगळ्यात श्रीमंत भारतीय कलाकार ठरला आहे. त्याने संपत्तीच्या बाबतीत इतर कलाकारांना मागे टाकलं आहे. ५८ वर्षाच्या शाहरुखची सध्याची संपत्ती ७ हजार ३०० कोटी रुपये आहे. शाहरुखचे अनेक बिजनेस आहेत. त्याचं स्वतःचं प्रोडक्शन हाऊस आहे. सोबतच त्याच्या चित्रपटांसाठीही तो रक्कम चार्ज करतो. त्याशिवाय एंडोर्समेंटमधूनही तो कोट्यवधींची कमाई करतो. तो कोलकाता नाइट रायडर्स या संघाचा मालक आहे. शाहरुखने या यादीत अमिताभ बच्चन, जुही चावला, करण जोहर आणि हृतिक रोशन यांनाही मागे टाकलं आहे. या यादीत मुंबईतही ३८६ व्यक्ती आहेत. दिल्लीतील २१७ आणि हैदराबादमधील १०४ लोकांची संपत्ती १ हजार कोटींच्यावर आहे.

# संजू बाबा व भाईजान दिसणार एकत्र

मराठी बॉलीवूडमध्ये असे कलाकार आहेत, ज्यांच्यावर चाहते वर्षानुवर्षे प्रेम करताना दिसतात. याबरोबरच, काही ऑनस्क्रीन जोड्यादेखील प्रेक्षकांच्या लाडक्या असतात. या कलाकारांपैकी एक जोडी म्हणजे सलमान खान आणि संजय दत्त यांची आहे. 'साजन', 'चल मेरे भाई' अशा चित्रपटांत एकत्र काम करणाऱ्या दोन अभिनेत्यांचा चाहतावर्ग मोठा आहे. महत्वाचे म्हणजे, आता अनेक वर्षांनंतर ते एकत्र दिसणार असल्याने सोशल मीडियावर मोठी चर्चा रंगली आहे. इंडो-कॅनेडियन गायक ए. पी. ढिल्लनच्या 'ओल्ड मनी' या म्युझिक प्रोजेक्टमध्ये ते एकत्र दिसणार आहेत. गायक ए. पी. ढिल्लने आगामी प्रोजेक्टचा एक टीझर प्रदर्शित केला आहे. हा टीझर प्रदर्शित करताना संजय दत्त, सलमान खान आणि रॅपर-गीत लेखक शिंदा काहलॉन यांना टॅग करत लिहिले, तुम्हाला माझी आठवण आली? मला माहीत आहे की, तुम्ही हे पाहिले नाही प्रदर्शित केलेल्या मोशन आर्ट व्हिडीओमध्ये सलमान खान, संजय दत्त आणि ए. पी. ढिल्लन दिसत आहे. अभिनेता सलमान खानने आपल्या इन्स्टाग्राम स्टोरीवर हा व्हिडीओ शेअर करत लिहिले आहे, ए. पी, गायक चांगला होता, आता अभिनेतादेखील आहे. सलमान खानने शेअर केलेल्या स्टोरीनंतर एपी, सलमान खान आणि संजय दत्त यांच्याबरोबर या प्रोजेक्टमध्ये अभिनय करणार असल्याचे म्हटले जात आहे. याबरोबरच संजय दत्तनेदेखील ए. पी. ढिल्लनच्या पोस्टवर कमेंट करत 'ब्रदर्स' असे लिहिले आहे. दरम्यान, ए. पी. ढिल्लनने संजय दत्त आणि सलमान खान यांच्याबरोबरच्या प्रदर्शित केलेल्या टीझरची सोशल मीडियावर मोठी चर्चा होताना दिसत आहे. आता गाण्याबरोबरच, ए पी ढिल्लनचा अभिनयाचीदेखील प्रेक्षकांना भूरळ पडणार का? हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे. आता अनेक वर्षांनंतर संजय दत्त आणि सलमान खान यांना एकत्र पाहण्यासाठी प्रेक्षकांमध्ये मोठी उत्सुकता पाहायला मिळत आहे. आता ते पुन्हा एकदा कमाल करणार का? हे पाहणेदेखील महत्वाचे ठरणार आहे.



# 'अद्भूत'मध्ये डायना पेंटी

भयपट 'अद्भूत'मध्ये नवाजुद्दीन सिद्दीकी आणि डायना पेंटी यांनी महत्त्वाची भूमिका साकारली आहे. चित्रपटात नवाजुद्दीन आणि डायनासोबत शशांक शेंडे, श्रेया धन्वंतरी आणि रोहन मेहरा दिसून येणार आहेत. या चित्रपटाचे लेखन आणि दिग्दर्शन सब्बीर खानने केले आहे. या चित्रपटाचा ट्रेलर शेअर करण्यात आला आहे. चित्रपटाचा ट्रेलर तसेच पोस्टर अभिनेत्री डायनाकडून शेअर करण्यात आला आहे. याच्या पोस्टरमध्ये नवाजुद्दीन काहीतरी विचार करताना तर पार्श्वभूमीत एका युवतीची सावली दिसून येते. यंदाचा सर्वात चकित करणाऱ्या चित्रपटांपैकी एक अदभूत. हा चित्रपट सोनी मॅक्सवर प्रदर्शित केला जाणार आहे. १५ सप्टेंबर रोजी हा चित्रपट पाहता येईल असे डायनाने नमूद केले आहे. भूत-प्रेत किंवा अलौकिक शक्तींवर विश्वास न ठेवणार्या युवतीची भूमिका डायना यात साकारत आहे. आपल्यासोबत काहीतरी अजब घडतंय अस वाटू लागल्यावर ही युवती मदतीसाठी एका तज्ञाकडे जात असल्याचे दाखविण्यात येणार आहे. अदभूत हा बॉलिवूडचा सुपरनॅचरल थ्रिलर ड्रामापट आहे. या चित्रपटाची निर्मिती सोनी पिक्चर्स इंडियाकडून करण्यात आली असून याचे चित्रिकरण मुंबईतील स्ट्रडिओत पार पडले आहे.





## 'कुली'त दिसणार रजनीकांत आणि आमिर एकत्र

बॉलीवूडचा 'मिस्टर परफेक्शनिस्ट' आमिर खान आणि साऊथचा सुपरस्टार रजनीकांत यांनी ३० वर्षांपूर्वी टेरर हाय टेरर या चित्रपटामध्ये एकत्र काम केले होते. जुही चावलानेही यात दमदार अभिनय केला होता. या चित्रपटानंतर चाहत्यांनी आमिर आणि रजनीकांत यांना कधीही पडद्यावर एकत्र पाहिले नाही. पण आता चाहत्यांची इच्छा पूर्ण होणार असल्याचं दिसत आहे. हे दोन सुपरस्टार 'कुली' चित्रपटात एकत्र काम करणार असून आता पुन्हा एकदा पडद्यावर खळबळ माजवणार आहेत. रजनीकांतच्या चित्रपटात आमिर खानचा कॅमिओ करणार असल्याची चर्चा सध्या रंगली आहे. लोकेश कनगराज दिग्दर्शित, हा चित्रपट मोठ्या बजेटमध्ये बनवला जात आहे आणि हा बहुप्रतिक्षित तमिळ चित्रपटांपैकी एक आहे. आमिर या चित्रपटाच्या कलाकारांमध्ये सामील झाल्याची बातमी त्याच्या चाहत्यांसाठी आश्चर्यचकित करणारी आहे. एका अहवालात म्हटले आहे की अभिनेता एक विशेष कॅमिओ करणार आहे. दरम्यान, कुली हा चित्रपट २०२५ साली प्रदर्शित होणार आहे. जुलैमध्ये हैदराबादमध्ये या चित्रपटाचे शूटिंग सुरू झाले आहे. रिलीजची तारीख अद्याप निश्चित झालेली नाही. पण २०२५ मध्ये तो रिलीज होऊ शकतो असे बोलले जात आहे. आमिर आणि रजनीकांत इतर प्रोजेक्ट्समध्येही काम करत आहेत. जेनेलिया डिसूजा आमिरच्या 'सीतारे जमीन पर'मध्ये झळकणार आहे. 'चॅम्पियन' या स्पॅनिश चित्रपटाचा हा हिंदी रिमेक आहे. रजनीकांत यांच्याकडे वेट्टायन आहे, ज्याचे दिग्दर्शन टीजे ज्ञानवेल करणार आहेत.

# तब्बल चार सिनेमातून भेटीला येणार अजय देवगण

बॉलिवूड आगामी काळात अजयचे चार सिक्वेल्स रिलीज होणार आहेत. त्यामुळे बॉक्स ऑफिसवर अजयचे 'सिक्वेल'राज पाहायला मिळेल. ॲक्शनपटांसोबतच कॉमेडी चित्रपटांमध्येही ठसा उमटवणार्या अभिनेता अजय देवगणचे यंदा तीन चित्रपट प्रदर्शित झाले आहेत. यापैकी आर. माधवन आणि ज्योतिकासोबतच्या 'शैतान'ने २११ कोटी रुपयांहून अधिक कमाई केली आहे. खूप अपेक्षा असलेल्या 'मैदान' आणि 'औरों में कहां दम था' या चित्रपटांनी चाहत्यांना निराश केलं. आगामी काळात अजयचे चार सिक्वेल्स रिलीज होणार आहेत. त्यामुळे बॉक्स ऑफिसवर अजयचे 'सिक्वेल'राज पाहायला मिळेल.

अजयच्या चाहत्यांना सर्वांत जास्त आतुरता ती म्हणजे 'सिंघम अगेन' सिनेमाची. रोहित शेट्टी दिग्दर्शित 'सिंघम' आणि 'सिंघम रिटर्न्स'मध्ये रसिकांना भावलेली अजयची सिंघम स्टाईल पुन्हा दिसणार आहे. यात अजयसोबत करीना कपूर, अक्षय कुमार, दीपिका पदुकोण, रणवीर सिंग, टायगर श्रॉफ, अर्जुन कपूर, जॅकी श्रॉफ, दयानंद शेट्टी अशी तगडी स्टारकास्ट आहे. यंदा दिवाळीच्या मुहूर्तावर हा चित्रपट सिनेमागृहांमध्ये धमाका करणार आहे. अजयचा दुसरा चित्रपट आहे 'रेड २'. या चित्रपटाद्वारे इन्कम टॅक्स ऑफिसर अमय पटनाईक पुन्हा प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. राज कुमार गुप्तांच्या दिग्दर्शनाखाली तयार झालेला हा चित्रपट २०१८मध्ये रिलीज झालेल्या 'रेड' या गाजलेल्या चित्रपटाचा सिक्वेल आहे. 'रेड'ने बॉक्स ऑफिसवर १५० कोटी रुपयांहून अधिक कमाई केली होती. 'रेड २'मध्ये रितेश देशमुख, वाणी कपूर, सौरभ शुक्ला, गायत्री अय्यर, रजत कपूर हे कलाकार आहेत. अजयचा आणखी एक सिक्वेल म्हणजे 'दे दे प्यार दे २' हा २०१९मध्ये प्रदर्शित झालेल्या 'दे दे प्यार दे' चित्रपटाचा हा सिक्वेल आहे. यातील तब्बू- अजय आणि रकुल प्रीत सिंग-अजय या दोन्ही जोड्यांच्या केमिस्ट्रीची जादू रसिकांनी अनुभवली होती. पहिल्या भागाचे दिग्दर्शन अकीव अलीने केलं होतं. तर सिक्वेलचं दिग्दर्शन अंशुल शर्मा करत आहेत. यात अजयसोबत रकुल, आर. माधवन आणि शरीक खान आहेत. अजयचा आणखी एक चित्रपट येत आहे तो म्हणजे 'सन ऑफ सरदार २'. अश्विनी धीर यांनी दिग्दर्शित केलेला 'सन ऑफ सरदार' २०१२ मध्ये प्रदर्शित झाला होता. या चित्रपटाने जवळपास १६१ कोटी रुपयांचा बिझनेस केला. या चित्रपटाच्या सिक्वेलसाठी अजय पुन्हा जसविंदर सिंग रंधावा म्हणजेच जस्सी बनला आहे. विजय कुमार अरोरा यांनी दिग्दर्शित केलेल्या या कॉमेडी चित्रपटात अजयच्या जोडीला मृणाल ठाकूर आणि संजय दत्त हे कलाकार मुख्य भूमिकेत आहेत.





## विक्रांत मैसीच्या नव्या चित्रपटाची घोषणा

बॉलिवूड अभिनेता विक्रांत मैसी सध्या तापसी पन्नू आणि सनी कौशल यांच्यासोबत 'फिर आई हसीन दिलरुबा'मध्ये दिसून आला आहे. त्याच्या या चित्रपटाला संमिश्र प्रतिसाद मिळत आहे. याचदरम्यान आता विक्रांतच्या आणखी एका चित्रपटाची घोषणा झाली आहे. अभिनेत्याचा हा आगामी चित्रपट ओटीटीवर प्रदर्शित होणार असून त्याचे नाव सेक्टर ३६ असणार आहे. निर्मात्यांनी याचे पोस्टर शेअर करत याच्या प्रदर्शनासंबंधी माहिती या पोस्टरमध्ये विक्रांत एका वेगळ्या अवतारात दिसून येत आहे. या चित्रपटाची निर्मिती मॅडॉक फिल्म्सकडून केली जाणार आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन आदित्य निंबाळकर करणार आहे. हा चित्रपट ओटीटी प्लॅटफॉर्म नेटफ्लिक्सवर १३ सप्टेंबर रोजी प्रदर्शित होणार आहे. विक्रांत मैसी आणि दीपक डोबरियाल या क्राइम थ्रिलर चित्रपटात काम करत आहेत. हा चित्रपट सत्य घटनांवर आधारित असल्याचे समजते. या चित्रपटात सत्ता, अपराध आणि सामाजिक विषमतेवर आधारित कहाणी दर्शविण्यात येणार आहे. आदित्य निंबाळकर हा या चित्रपटाच्या माध्यमातून दिग्दर्शनाच्या क्षेत्रात पदार्पण करणार आहे.



# माझ्या आयुष्यात सध्या खूप नाती

बॉलीवूडचा मिस्टर परफेक्शनिस्ट अभिनेता आमिर खान त्याच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल फार बोलत नाही. आमिरने दोन लग्नं केलीत, दोन्हीवेळा त्याचा घटस्फोट झाला. जवळपास तीन दशकं सिनेसृष्टीत सक्रिय असलेल्या आमिरने खूप सिनेमे केले. पण आता तो कामाला नाही तर कुटुंबाला प्राधान्य देतो. आमिरने नुकतीच रिया चक्रवर्तीच्या पॉडकास्टमध्ये हजेरी लावली. यावेळी त्याने त्याला विचारण्यात आलेल्या प्रश्नांची मोकळेपणाने उत्तरं दिली. त्याला तिसऱ्या लग्नाबाबत विचारण्यात आलं, त्याबाबतही त्याने प्रतिक्रिया दिली. तसेच तो अजुनही दोन्ही पूर्वाश्रमीच्या पत्नी रीना दत्ता व किरण राव यांच्या खूप जवळ आहे, असंही त्याने नमूद केलं. गेल्या काही वर्षांत लग्नसंस्था कशी बदलली आहे, याकडे रियाने लक्ष वेधले. तसेच तिने आमिरला लग्नाबाबत त्याचं मत विचारलं आणि तिने लग्न करावं का? याबद्दल सल्ला मागितला. त्यावर माझी दोन्ही लग्नं अयशस्वी राहिली. त्यामुळे माझ्याकडून लग्नाचा सल्ला घेऊ नकोस, असं गमतीने आमिर म्हणाला. मला एकटं राहायला आवडत नाही, मला जोडीदाराची गरज आहे. मी एकलकोंडा नाही, मला सहवास आवडतो. आयुष्याचा काहीच भरवसा नाही, असं आमिर खान म्हणाला. रियाने आमिर खानला विचारलं की तो तिसऱ्यांदा लग्न करण्याचा विचार करत आहे का? त्यावर अभिनेता म्हणाला, मी आता ५९ वर्षांचा आहे, त्यामुळे मला वाटत नाही आता मी पुन्हा लग्न करेन. माझ्या आयुष्यात सध्या खूप नाती आहेत, मी माझ्या कुटुंबाशी, माझ्या मुलांशी पुन्हा कनेक्ट झालोय. माझ्या जवळच्या लोकांबरोबर राहून मला खूप आनंद होतो. मी एक चांगली व्यक्ती बनण्यासाठी प्रयत्न करत आहे. दरम्यान, आमिर खानचे पहिले लग्न रीना दत्ताशी १९८६ साली झालं होतं आणि ते १६ वर्षांनी विभक्त झाले होते. पहिल्या लग्नापासून आमिरला जुनैद खान हा मुलगा व आयरा खान ही मुलगी आहे. त्यानंतर त्याने २००५ मध्ये किरण रावशी दुसरं लग्न केलं. या लग्नापासून त्याला आझाद नावाचा मुलगा आहे. आमिर व किरण यांचा १६ वर्षांच्या संसारानंतर घटस्फोट झाला. आमिरचे दोन घटस्फोट झाले असले तरी त्याच्या दोन्ही पत्नी, तो, त्याची आई सर्वजण एकाच इमारतीत राहतात. ते सर्व सण उत्सव एकत्र साजरे करतात.



# जान्हवी कपूरचा ज्यु. एनटीआरसोबत रंगणार रोमान्स

अभिनेत्री जान्हवी कपूर आणि Jr NTR च्या 'देवरा' चित्रपटातील गाणे 'धीरे- धीरे' रिलीज झाले आहे. रोमँटिक अंदाजात जान्हवी खूप मादक दिसत आहे. जान्हवी कपूर-ज्युनियर एनटीआर चित्रपट 'देवरा'चे सेकंद सिंगल 'धीरे-धीरे' रिलीज केलं आहे. दोघेजणही रोमँटिक अंदाजात पाहायला मिळत आहेत. बॉलीवूड अभिनेत्री जान्हवी कपूर सध्या आपला चित्रपट 'उलझ'मुळे चर्चेत आहे. हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर खास कमाल दाखवू शकला नाही. तिचा आगामी चित्रपट 'देवरा'मुळे चर्चा सुरू झाली आहे. या चित्रपटाचे गाणे 'धीरे-धीरे' रिलीज करण्यात आले आहे. 'धीरे-धीरे' देवरा या चित्रपटाचे दुसरे गाणे आहे. याआधी ज्युनियर एनटीआर- जान्हवीचा चित्रपट 'देवरा'चे पहिले गाणे 'फियर' रिलीज झाले होते. हे गाणे पसंतीस उतरले होते. आता 'धीरे-धीरे' गाणे देखील फॅन्सच्या पसंतीस उतरत आहे. यामध्ये ज्युनियर एनटीआर आणि जान्हवीचे गजब रोमँटिक अंदाजात पाहायला मिळत आहे. हे गाणे हिंदी शिवाय तेलुगु, मल्याळम आणि कन्नड भाषेत रिलीज करण्यात आले आहे. जान्हवी कपूर- ज्युनियर एनटीआरचा चित्रपट 'देवरा'तील धीरे-धीरे गाण्याला शिल्पा रावने आवाज दिला आहे. तर अनिरुद्धने एनटीआरसाठी आवाज दिला आहे. यामध्ये जान्हवी-ज्युनियर एनटीआरच्या गजब केमिस्ट्रीने फॅन्सची मने जिंकली आहेत. दोघेही रोमँटिक अंदाजावर फॅन्स फिदा झाले आहेत. हे गाणे ऐकल्यानंतर एका युजरने ज्युनियर एनटीआरला खरा ग्लोबल स्टार म्हटलं आहे. तर एका युजरने लिहिलं की, 'खूप चांगलं गाणं आहे, जय एनटीआर'. दुसऱ्या एका युजरने जान्हवी-ज्युनियर एनटीआर शिवाय गायिका शिल्पाचे कौतुक करत लिहिले की, 'एनटीआरची उपस्थिती आधिक जान्हवीचे एक्स्प्रेशन्सआधिक शिल्पाचा आवाज'. आणखी एकाने फायर इमोजी शेअर केली आहे. जान्हवी कपूरसाठी हा चित्रपट खूप खास ठरणार आहे. कारण, ते 'देवरा'च्या माध्यमातून साऊथ चित्रपट इंडस्ट्रीमध्ये आपले डेब्यू करायला जात आहे. श्रुती मराठे, प्रकाश राज, श्रीकांत, सैफ अली खान, शाईन टॉम चाको देखील चित्रपटात दिसतील. 'देवरा' मोठ्या पडद्यावर २७ सप्टेंबर २०२४ रोजी रिलीज होईल.

# मी शाहरुख खानपेक्षाही जास्त स्ट्रगल केला

'भुलभुलैया बॉलिवूड अभिनेत्री कंगना राणौत सध्या तिच्या आगामी 'इमर्जन्सी' चित्रपटामुळे चर्चेत आहे. लवकरच हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे. काही दिवसांपूर्वी कंगनाने स्वत:ला आणि शाहरुख खानला त्यांच्या पिढीतील शेवटचे स्टार असं संबोधलं होतं. आता तिने असं म्हणण्यामागचं कारण सांगितलं आहे. कंगना म्हणते की, ती आणि शाहरुख खान आऊटसाइडर्स आहेत. दोघेही फिल्म इंडस्ट्रीतील नाहीत. तसेच तिचा बॉलिवूडमधील प्रवास हा शाहरुख खानपेक्षा कठीण होता. कंगना म्हणाली की, मी आणि शाहरुख खान आऊटसाइडर्स आहोत. शाहरुख दिल्लीचा आहे आणि तो फिल्मी बॅकग्राऊंडचा नाही. तो सर्वात टॉप स्टार बनला. तो अशा कुटुंबातून आला आहे जिथे प्रत्येकजण चांगलं इंग्रजी बोलू शकतो. मुंबईला आल्यावर फारसा फरक पडत नाही, पण मी गावातून आले आहे. मी एक मुलगी आहे. माझा प्रवास जास्त कठीण होता. जास्त स्ट्रगल केला. ती म्हणाली, नव्या पिढीत कोणी स्टार झालंय असं मला वाटत नाही. स्टार्स हे आमच्या पिढीतील आहेत. कोणताही नवा अभिनेता स्टार झाला नाही. मात्र, ते प्रयत्न करत आहेत. शाहरुखच्या 'पठाण' चित्रपटाच्या यशावर प्रतिक्रिया दिली होती. ती म्हणाली की, शाहरुख खान यांचे दहा वर्षे चित्रपट चालले नाहीत, मग पठाण चालला. माझे सात-आठ वर्षे चालले नाहीत, नंतर क्वीन चालला. आता इमर्जन्सी या तिच्या चित्रपटाची चर्चा आहे.

# चियान विक्रमचा 'तंगलान' हिंदीत होणार रिलीज

साऊथचा सुपरस्टार चियान विक्रमचा चित्रपट 'तंगलान' सध्या चर्चेत आहे. रणजीत यांनी लेखन आणि दिग्दर्शन केले आहे. KGF ची खरी कहाणी सांगणाऱ्या या चित्रपटाला बॉक्स ऑफिसवर जबरदस्त प्रतिसाद मिळत आहे. हा चित्रपट जगभरात १०० कोटींचा टप्पा गाठण्यासाठी सज्ज झाला आहे. ॲक्शनने भरलेल्या या चित्रपटाने पहिल्याच दिवशी उत्तम कलेक्शनही केले. साऊथ बॉक्स ऑफिसवर चित्रपटाला मिळालेला उदंड प्रतिसाद पाहून हिंदी प्रेक्षकही त्याच्या प्रदर्शनाची वाट पाहत होते. अशात आता ती प्रतीक्षाही संपणार आहे. चियान विक्रमचा 'तंगलान' चित्रपट साऊथ बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई करत आहे. आंध्र-तेलंगणामध्ये रिलीजच्या दुसर्‍या आठवड्यात या चित्रपटाला आणखी १४१ स्क्रीन मिळाले आहेत.



यामध्ये वाढ नोंदवण्यात आली आहे. १५ ऑगस्ट रोजी तामिळनाडूमध्ये रिलीज झाला होता. हा चित्रपट जगभरातील बॉक्स ऑफिसवर १०० कोटींचा आकडा गाठणार आहे. हा चित्रपट चियान विक्रमच्या कारकिर्दीतील सर्वोत्कृष्ट चित्रपट ठरला आहे, ज्याने पहिल्या दिवशी चांगली कमाई केली. हिंदीत 'टांगलान' कधी रिलीज होणार? असा प्रश्नही चाहत्यांकडून विचारला जात होता. आता 'तंगलान' हा चित्रपट हिंदीत रिलीज डेट पुढे आली आहे. ६ सप्टेंबर रोजी उत्तर भारतातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होऊ शकतो, असे सांगण्यात येत आहे. हा चित्रपट हिंदीत प्रदर्शित झाल्यास त्याचे बॉक्स ऑफिस कलेक्शन फायदेशीर ठरेल, असे निर्मात्यांना वाटते. या चित्रपटाने त्याच्या निर्मिती खर्चाची भरपाई करण्यासाठी चांगली कमाई केली आहे. 'तंगलान' च्या स्टार कास्टबद्दल बोलायचे झाले तर, चियान विक्रम, पार्वती थिरुवोथू, मालविका मोहनन, डॅनियल कॅलटागीरोन आणि पसुपती यांनी जबरदस्त परफॉर्मन्स दिला आहे. या चित्रपटाची कथा १८व्या आणि १९ व्या शतकातील वास्तविक घटना सांगते. हे कोलार गोल्ड फील्ड्स (KGF) ची ऐतिहासिक आणि अनोखी कथा सादर करते. पा. रंजित दिग्दर्शित, चियान विक्रम आणि मालविका मोहनन स्टारर 'टांगलन' तामिळ, तेलगू, कन्नड आणि मल्याळममध्ये जगभरात प्रदर्शित होणार आहे.



# क्रीतिसोबत झळकणार धनुष

दक्षिणेतील सुपरस्टार धनुष्य स्वत:चा आगामी चित्रपट 'कुबेर'मुळे सध्या चर्चेत आहे. तर आता अभिनेता लवकरच एका बॉलिवूड अभिनेत्रीसोबत काम करणार आहे. अभिनेत्री क्रीति सेनॉन आणि धनुष लवकरच एका चित्रपटात दिसून येणार आहेत. २०१३ मध्ये 'रांझणा' चित्रपटाच्या यशानंतर दिग्दर्शक आनंद एल. राय आणि अभिनेता धनुष पुन्हा एकदा 'तेरे इश्क में' नाव असलेल्या रोमँटिक चित्रपटासाठी एकत्र येणार आहेत. या संगीतमय प्रेमकहाणीत मुख्य नायिका म्हणून क्रीति सेनॉन काम करणार आहे. या चित्रपटाला ए. आर. रहमान यांचे संगीत लाभणार आहे. तर याची कहाणी इरशाद कामिल यांची असणार आहे. क्रीति सेनॉनने या चित्रपटात काम करण्यासाठी होकार दर्शविला आहे. या चित्रपटाचे चित्रिकरण ऑक्टोबर महिन्यात सुरु होऊ शकते. तर हा चित्रपट पुढील वर्षी प्रदर्शित होणार आहे. क्रीति सेनॉनचा 'दो पत्ती' हा चित्रट प्रदर्शनाच्या वाटेवर आहे. तर धनुष आगामी काळात 'कुबेर' या चित्रपटात रश्मिका मंदानासोबत दिसून येणार आहे.

# प्रभासच्या चाहत्यांसाठी मोठी मेजवानी

अभिनेता प्रभासने त्याच्या चित्रपटांच्या माध्यमातून जागतिक स्तरावर एक खास ओळख निर्माण केली आहे. बाहुबली २ आणि कल्की २८९८ एडी सारख्या चित्रपटांनी परदेशातही मोठी कमाई केली होती. आतापर्यंतच्या कारकिर्दीत त्याने अनेक सुपरहिट चित्रपट देऊन लोकांच्या मनावर खोलवर छाप सोडली आहे. डार्लिंग हा चित्रपटही त्यापैकीच एक. हा चित्रपट २०१० मध्ये प्रदर्शित झाल्यापासून त्याला डार्लिंग हे टोपणनाव देण्यात आले. नुकतीच त्यांच्या या चित्रपटाबाबत एक मोठी माहिती समोर आली आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, अभिनेत्याचा हा सुपरहिट चित्रपट पुन्हा प्रदर्शित करण्याची तयारी सुरू आहे. २३ सप्टेंबरला हा चित्रपट पुन्हा एकदा प्रेक्षकांच्या भेटीला येणार असल्याचं सांगण्यात येत आहे. या चित्रपटातील आपल्या अभिनयाने या अभिनेत्याने प्रेक्षकांची मने जिंकली. अशा परिस्थितीत हा चित्रपट पुन्हा प्रदर्शित होणे ही त्याच्या चाहत्यांसाठी एखाद्या मोठ्या भेटवस्तूपेक्षा कमी नाही. डार्लिंग या चित्रपटाने प्रभासच्या करिअरला आकार देण्यात विशेष भूमिका बजावली. या चित्रपटाचे दिग्दर्शन ए. करुणाकरन यांनी केले. या रोमँटिक ड्रामा चित्रपटात काजल अग्रवालही मुख्य भूमिकेत होती. चित्रपटाची कथा दोन्ही स्टार्सभोवती विणली गेली आहे. मात्र, एका गँगस्टरची मुलगी प्रभासच्या प्रेमात पडल्यावर चित्रपटात ट्विस्ट पाहायला मिळतो. वर्क फ्रंटबद्दल बोलायचे झाले तर प्रभास सध्या अनेक चित्रपटांमध्ये काम करत आहे. त्याच्याकडे मारुतीचा 'द राजा साहेब' हा दिग्दर्शक आहे. याशिवाय तो हनु राघवपुडीच्या चित्रपटातही दिसणार आहे. याव्यतिरिक्त, तो सालार भाग २ आणि संदीप रेड्डी वंगा यांच्या स्पिरिटवर देखील काम करत आहे.



# 'आदिपुरुष'नंतर कुठे गायब होता ओम राऊत?

२०२३ साली रिलीज झालेला 'आदिपुरुष' सिनेमा सर्वांना आठवत असेलच. रामायणावर आधारीत 'आदिपुरुष' सिनेमावर प्रचंड प्रमाणात टीका झाली. प्रभासने साकारलेली प्रभू श्रीरामांची भूमिका लोकांना आवडली नाही. सिनेमातले VFX कल्पनाशक्तीचा वापर करुन घेतलेली सिनेमॅटिक लिबर्टी अशा अनेक गोष्टींवर उलटसुलट चर्चा झाली. 'आदिपुरुष' रिलीज होऊन एक वर्ष उलटलं तरीही ओम राऊत कुठेच दिसला नाही. तो वर्षभर जणू गायबच होता. अखेर एका मुलाखतीच्या निमित्ताने ओम राऊतने सर्व प्रश्नांना उत्तरं दिली. वर्षभरात मीडियापासून का लांब राहिला? असा प्रश्न ओम राऊतला विचारण्यात आला. त्यावेळी त्याने उत्तर दिलं की, मला ट्रोलिंगचा कंटाळा आला होता. म्हणजे कुठे बाहेर जेवायला गेलो अन् त्याचा फोटो टाकला तर वाट्टेल ते ट्रोलिंग व्हायचं. त्यामुळे खूप त्रासदायक वातावरण निर्माण झालं होतं. पण आता ठरवलं की काय वाट्टेल ते होऊन जाऊदे. जोवर चित्रपट प्रमोशनला येत नाही तोवर त्यावर बोलून काय फायदा होत नाही. ट्रोलिंगचा त्रास झाला सुरुवातीला पण आता मी विचार नाही करत. ज्यांचा चेहराच नाही अशा ट्रोलर्सला फारसं महत्व देण्याची गरज वाटत नाही. चादरीच्या आडून बोलणं सोप्पं आहे. चित्रपट पाहून समोरासमोर काहीतरी चर्चा होणं गरजेचं आहे. हे ट्रोलिंग चित्रपटापुरतं ठीक आहे, पण मी बायकोसोबत फोटो टाकल्यावर त्याच्यावर कोण काहीतरी बोलत असेल तर त्याला अर्थ नाही. जे प्रेक्षक थिएटरमध्ये सिनेमा पाहायला येतात त्यांना चित्रपटावर समीक्षा करायचा हक्क आहे. ओम राऊत या मुलाखतीत 'आदिपुरुष'बद्दल पुढे म्हणाला की, आदिपुरुषने बॉक्स ऑफिसवर जी कमाई केली आणि ही जी चर्चा झाली त्यामध्ये तफावत आहे. पहिल्याच दिवशी आम्ही ७० कोटींची भारतात कमाई केली. नंबर मोठे असल्याने निर्माता जागेवर राहतो. तो पुढच्या सिनेमासाठी विचारणा करतो. पण आमचं परसेप्शन कायम राहिल असतं तर आम्ही आणखी मोठे नंबर बघू शकलो असतो. ते घडलं नाही याचं दुःख आहे.



# अमृताचा नवीन चित्रपट येणार प्रेक्षकांच्या भेटीला



'वाजले की बारा' आणि 'चंद्रा' गाणं म्हटलं की आठवते ती अमृता खानविलकर. आपल्या सौंदर्याने आणि अभिनयाने प्रेक्षकांच्या मनात स्थान मिळवणाऱ्या अमृताचा आगामी चित्रपट लवकरच प्रदर्शित होणार आहे. दिवसांपासून सोशल मीडियावर 'आपण शोधायचं का रोहित चौहानला?' अशी पोस्ट व्हायरल होत होती. अनेकांना हा रोहित चौहान कोण असा प्रश्न पडला होता. तर आता हा रोहित चौहान कोण आहे, या संदर्भात अमृताने सोशल मीडियावर पोस्ट केली आहे. 'लाईक आणि सबस्क्राईब' असं तिच्या आगामी चित्रपटाचं नाव आहे. या चित्रपटात तिच्याबरोबर अमेय वाघ आणि जुई भागवत हे कलाकार मुख्य भूमिकेत पाहायला मिळणार आहेत. सध्याची तरुण पिढी ही सोशल मीडियाच्या आहारी गेल्याचं अनेकदा दिसून येतं. या सोशल मीडियामुळे अनेकांची मोठ्या प्रमाणात फसवणूक झाल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. याच घटनांना अनुसरुन अमृताचा आगामी चित्रपट असल्याच्या चर्चा आहेत. "Like AmU Subrbribe साठी हसणं की फसणं?' असं कॅप्शन देत चित्रपटाचं पोस्टर इन्स्टाग्रामवर पोस्ट करण्यात आला आहे. चित्रपटाची कथा अद्याप गुलदस्त्यात आहे. मात्र कॅप्शन पाहता हा चित्रपट सस्पेन्स थ्रिलर असल्याची शक्यता आहे. पोस्टरमध्ये अमृता, जुई आणि अमेय सेल्फी काढताना दिसत आहेत. सेल्फीत दिसणारे चेहरे आणि मागे दिसणाऱ्यावरील हावभाव वेगळे आहेत. या चेहऱ्यामध्ये काही रहस्ये दिसत आहेत. त्यामुळे 'लाईक आणि सबस्क्राईब'मागे हे काय गुपित आहे. हे चित्रपट पाहिल्यावरच कळणार आहे. दिग्दर्शन अभिषेक मेरूकर यांनी केले आहे.

# शिवरायांच्या भूमिकेत दिसणार 'हा' अभिनेता

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अनेक शूर मावळ्यांनी जीवाची बाजी लावत इतिहास घडवला. शिवकाळातील नररत्नांपैकी एक म्हणजे रणझुंजार मुरारबाजी देशपांडे होय. स्वामीनिष्ठ मुरारबाजी देशपांडे यांचा पराक्रमी इतिहास आजही प्रत्येकाला प्रेरणा देणारा आहे. स्वराज्याच्या इतिहासात पुरंदरचे 'काळभैरव' म्हणून ओळख असणारे मुरारबाजी देशपांडे यांची यशोगाथा १४ फेब्रुवारी २०२५ ला 'वीर मुरारबाजी पुरंदर की युद्धगाथा' या चित्रपटातून रुपेरी पडद्यावर येण्यार आहे. हा चित्रपट हिंदी आणि मराठी या दोन्ही भाषांमध्ये प्रदर्शित होणार आहे. मालिका विश्वात 'श्रीकृष्ण' आणि 'महादेव' यांची तसेच 'ओम नमो व्यंकटेशाय' या दाक्षिणात्य चित्रपटात 'तिरुपती बालाजी' यांची भूमिका साकारत प्रचंड लोकप्रियता मिळवणारे अभिनेते सौरभराज जैन या चित्रपटात छत्रपती शिवाजी महाराजांची भूमिका साकारत आहे. 'फत्तेशिकस्त' आणि 'पावनखिंड' चित्रपटाच्या घवघवीत यशानंतर आलमंड्स क्रिएशन्स व ए.ए. फिल्म्स यांनी 'वीर मुरारबाजीपुरंदरकी युद्धगाथा' चित्रपटाची घोषणा केली आहे. या चित्रपटाची निर्मिती अजय आरेकर, अनिरूद्ध आरेकर, भाऊसाहेब आरेकर यांची आहे. सगळ्या देवतांच्या भूमिका तसेच आपलं आराध्य दैवत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांची भूमिका करायला मिळणे हे मी भाग्यचं समजतो. 'छत्रपती शिवाजी महाराजांची भूमिका पडद्यावर साकारण्याची संधी मिळणे माझ्यासाठी अभिमानास्पद आहे. माझ्या आजवरच्या पौराणिक भूमिकांना प्रेक्षकांनी भरभरून प्रेम दिलं. आपलं आराध्य दैवत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांची मी साकारत असलेल्या भूमिकेला ही प्रेक्षकांचं हेच प्रेम मिळेल, अशी आशा सौरभराज जैन यांनी व्यक्त केली. पुरंदरच्या लढाईतल्या पराक्रमाने मुघलांना भयभीत करुन सोडणाऱ्या मुरारबाजी देशपांडे यांची ही यशोगाथा आजच्या पिढीला चित्रपटाच्या माध्यमातून समजावी यासाठी 'वीर मुरारबाजी पुरंदर की युद्धगाथा' हा चित्रपट आम्ही घेऊन येत असल्याचे निर्माते अजय आरेकर यांनी सांगितले.




# हेरकथा

**हेरांचा सम्राट म्हणावा असा एकच (काल्पनिक) पुरुष आहे जेम्स बाँड! या सम्राटाच्या हेरकथांच्या नकला करून आपल्याकडे बरेच चित्रपट बनले. आपल्याकडच्या कित्येक चित्रपटात नायक एक सामान्य माणूस म्हणून दाखवला असतो; मात्र खलनायकाचा सफाया झाल्यावर, तो एक 'सरकारी एजंट' असल्याचं घोषित करण्यात येतं. नव्या काळात (विशेषत: केंद्रात सत्ताबदल झाल्यानंतर) काही खऱ्या हेरांच्या कामगिरीवर आधारलेले चित्रपट आपल्याकडे तयार झालेत. यांच्याबद्दल नेहमी 'सत्यघटनांवरून प्रेरित' असे म्हटले जाते. चला जरा त्यांच्याकडे लक्ष देऊ या...**

### आरएडब्लू (रोमियो अकबर वॉल्टर) २०१९ :

भारताला १५ ऑगस्ट १९४८ रोजी स्वातंत्र्य प्राप्त झाले. मात्र, देशाची फाळणी झाली. पाकिस्तान या नव्या देशाचा जन्म झाला. त्यावेळी हा नवा देश पाकिस्तान आणि पूर्व पाकिस्तान अशा दोन तुकड्यांचा बनलेला होता. लवकरच पूर्व पाकिस्तानमध्ये असंतोष निर्माण झाला आणि स्वातंत्र्याची मागणी करण्यात येऊ लागली. पाकिस्तानने पूर्व पाकिस्तानमध्ये सामान्य जनतेवर अमानुष अत्याचारांना सुरुवात केली. मुक्ती वाहिनी नामक सेना पाकिस्तानी सेनेशी लढत होती. (असे म्हणतात की, या मुक्ती वाहिनी सेनेला भारतीय सेनेचा भक्कम पाठिंबा होता.) पुढे भारत सरकारने पाकिस्तानला आपल्या हवाई सीमा बंद केल्या आणि त्यांची कोंडी केली. १६ डिसेंबर १९७१ ला पाकिस्तानी सेनेला शरणागती पत्करावी लागली आणि बांगलादेश नामक एका नव्या राष्ट्राचा जन्म झाला. प्रस्तुत चित्रपट याच काळाशी निगडित आहे. चित्रपट कथेनुसार रिसर्च अँण्ड अॅनालिसिस विंग (रॉ) चे प्रमुख श्रीकांत राय (जॅकी श्रॉफ) रहेमतुल्ला अली ऊर्फ रोमियो या बँकेत कार्यरत तरुणाला 'रॉ' मध्ये समाविष्ट करून घेतो. रोमियोची कार्यक्षमता तपासणे आवश्यक असते. त्यासाठी त्या बँकेवर दरोडा टाकला जातो, ज्याला रोमियो उधळून लावतो. रोमियोचे वडील भारतीय सैन्याकडून लढताना हुतात्मा झाले असतात. देशसेवेची संधी आलेली बघून रोमियो ती स्वीकारतो. त्याला हेरगिरीसाठी आवश्यक आणि उपयुक्त असे प्रशिक्षण दिले जाते. तो पाकव्याप्त काश्मीरमधील अकबर मलिक नावाचा आई-बाप गमावलेला तरुण आहे, असं सिद्ध करणारी कागदपत्रे, भूतकाळ निर्माण केला जातो. त्याचा शिरकाव पाकव्याप्त काश्मीरमध्ये करून दिला जातो. अनेक हिकमती लढवून तो इशाक अफरिदीशी (अनिल जॉर्ज) जवळीक साधण्यात यशस्वी होतो. त्याला तेथे मुद्दस्सर (रघुवीर यादव) आणि जोकर (मुश्ताक काक) हे 'रॉ'चे हस्तक मदत करीत असतात. इशाक अफरिदी पाकिस्तानी जनरलसोबत जवळचे संबंध असतात. यामुळे अकबरला आतल्या गोटातील बातम्या सहजी हाती लागतात. पाकिस्तानने बदलीपूर गावावर हवाई हल्ल्याची योजना केली असते; ज्यामुळे अनेक निरपराध नागरिकांचा बळी जाणार असतो. तिचा सुगावा रोमियो-अकबरला लागतो. तो ही बातमी श्रीकांत रायला देतो. त्याचवेळी मला फार एकटं वाटतंय, असंही सांगतो. पाकिस्तानमध्ये त्यांची भेट श्रद्धा शर्माशी (मौनी राय) होते. ती तेथे राजदूतावासात कर्मचारी म्हणून आलेली असते. त्या अगोदर ती रोमियोची बँक सहकारी असते. हीसुद्धा आपल्यासारखीच 'रॉ' एजंट आहे, याचा त्याला सुखद धक्का बसतो. ते दोघे एकमेकांना लपून चोरून भेटतात. त्यांच्यात थोडे फार प्रेमही फुलते; मात्र कर्नल खानला (सिकंदर खेर) अकबरचा संशय येतो. आपल्यापरीने अकबरला अटक करून त्याची जोरदार चौकशी करतो, पण त्याला काहीही पुरावा मिळत नाही. पोलिस आणि सेनेपासून लपत लपत अकबर घरी येतो. तेथे मुद्दस्सर आलेला असतो, तो अकबरला चहा बनवून द्यायला आत जातो. रोमियोला जाणवते की, कोणीतरी पिस्तूल घेऊन येत आहे.






तो क्षणात त्यावर गोळीबार करून त्याला ठार करतो. जाऊन बघतो तर मेलेला इसम मुद्दस्सर असतो! अकबरच्या डोळ्यात पाणी येतं! रोमियो/अकबरचा श्रीकांत रायशी संवाद होतो. श्रीकांत त्याला आता तू पाकिस्तानीच झाला आहेस असे म्हणतो. त्यानंतर मी भारताचा हेर नसून पाकिस्तानशीच एकनिष्ठ आहे हे सिद्ध करायला अकबर बदलीपूरवर बॉम्बहल्ला करायला मीच जातो, असे म्हणतो. त्यानुसार जातो आणि ती योजना पूर्ण करतो. १० वर्षांनंतर नेपाळमध्ये श्रीकांतची अकबरशी भेट होते; मात्र तेव्हा अकबर वॉल्टर खान झालेला असतो आणि पाकिस्तान सरकारमध्ये सुरक्षा सल्लागाराच्या पदावर नियुक्त असतो. दोघांमध्ये अगदी थोडा संवाद होतो. त्यावेळी वॉल्टर, श्रीकांत रायचा सहायक असलेल्या अवस्थीला (राजेश शृंगारपुरे) भावी रॉ प्रमुख पदासाठी शुभेच्छा देतो. श्रीकांत उलगडा करतो की, रोमियो/अकबर/वॉल्टर अजूनही भारताचाच गुप्तहेर आहेत आणि सध्या जोकर पदावर आहे. बदलीपूरवरील हल्लादेखील एक कटच होता. हल्ला होण्यापूर्वी २४ तास अगोदर ते गाव रिकामे करण्यात आले होते. देशसेवेसाठी तो आपल्या आईच्या अंत्यसंस्कारालासुद्धा गैरहजर होता.

### राझी (२०१८)

याही चित्रपटाचा काळ १९७१ च्या आसपासचाच आहे. काश्मीरचा निवासी हिदायत खान (रंजीत कपूर) हा भारताचा हेर असतो. त्याचे पाकिस्तानी ब्रिगेडियर परवेझ सईदशी (शिशिर शर्मा) मैत्रीचे संबंध असतात. तो आपली मुलगी सहेमतला (आलिया भट्ट) हेर बनण्यासाठी उद्युक्त करतो. ती 'राजी' होते. तिला हेरगिरीसाठी आवश्यक आणि उपयुक्त असे प्रशिक्षण दिले जाते. नंतर तिचा विवाह परवेझ सईदच्या दुसऱ्या मुलाशी इक्बाल सईद (विकी कौशल) सोबत होतो. नवरा, मोठा दीर आणि सासरा असे तिघेही पाकिस्तानी सेनेत कार्यरत असल्याने बरीच गोपनीय माहिती तिला सहजी समजू लागते. ही माहिती ती भारतात 'रॉ'कडे पाठवायला सुरुवात करते. अशात ब्रिगेडियर परवेझची पदोन्नती होऊन त्याला मेजर जनरलचे पद प्राप्त होते. आता घरात बऱ्याच महत्त्वाच्या अधिकाऱ्यांची ये-जा वाढते. कित्येक गोपनीय कागदपत्रे घरात यायला लागतात. सहेमतचे काम अजून सोपे होते. दरम्यान, तिचे आपल्या नवऱ्यावर खरंच प्रेम जडते. एकदा रात्रीच्या वेळी ती भारतात 'रॉ'कडे संदेश पाठवत असताना घरातील म्हातारा नोकर अब्दुल ते बघतो. अब्दुल ती बातमी सांगायला तडक घराबाहेर पडतो; त्या पाठोपाठ सहेमत जीप घेऊन त्याच्या पाठीमागे लागते आणि त्याला धडक देऊन ठार करते. तिला या कृत्याचा अतिशय मनःस्ताप होतो. पाकिस्तान बंगालच्या उपसागरात पाणबुडी पाठवून भारतीय नौदलाचे जहाज आयएनएस विक्रांतवर घातक हल्ला करण्याच्या प्रयत्नात आहे, अशी महत्त्वाची माहिती सहेमत पाठवते. पण तिच्या मोठ्या दिराला- महेबूब सईदला सहेमतचा संशय येतो. ती लगेचच त्याच्या मागे जाऊन त्यालाही ठार करते. चित्रपटाच्या शिरोबिंदूत इक्बाललाही सहेमतचे खरे रूप समजून येते. सहेमत आणि इक्बाल एकमेकांना भेटायला येतात, तेव्हा सहेमतचे गुपित कायम राहावे म्हणून भारतीय हस्तक त्यांच्यावर ग्रेनेड फेकतात. अर्थातच दोघेही मृत्युमुखी पडतात. नंतर उघडकीस येते की, सहेमत तसारखा बुरखा घालून आलेली मुलगी तिची मैत्रीण होती. गर्भवती सहेमत भारतात परतते. तिला झालेला मुलगा भारतीय नौदलाच्या ताफ्यात दाखल होतो. विमनस्क अवस्थेत बसलेल्या प्रौढ सहेमतच्या चेहऱ्यावर चित्रपट समाप्त होतो. देशासाठी एकवेळ प्राण देणं सोपं ठरेल, पण त्या खातर ज्यांच्या घरचे बनून राहिलो, त्यांचे जीव घ्यायचे हे कठीण कर्म आहे. ही खंत बाळगून तिला उर्वरित आयुष्य कंठावे लागते. हरिंदर सिक्का यांच्या 'सहेमत कॉलिंग' या कादंबरीवर हा चित्रपट आधारलेला आहे. कादंबरी लिहिताना सगळी नावे बदलून टाकली आहेत, असं त्यांचं म्हणणं आहे. वर वर्णन केलेल्या दोन्ही चित्रपटांमध्ये पाकिस्तानात हेर म्हणून गेलेल्या व्यक्ती मुसलमान आहेत. भारतातले मुसलमान पाकधार्जिणे असतात. या सार्वत्रिक समजाला तडा देण्याचे काम या चित्रपटांनी केले आहे, असं म्हणायला हरकत नाही. हेर म्हणून कार्यरत असताना जीवाची पर्वा करायचीच नसते, पण स्वतःच्या व्यक्तिगत आयुष्याला विसरावे लागते. स्वरक्षणार्थ अन्य कुणालाही चुटकीसरशी संपवावे लागते. स्वतःची अपरिमित मानसिक हानी करून घ्यावी लागते. या कटू गोष्टी या दोन्ही चित्रपटांनी अधोरेखित केल्या. हे चित्रपट एक आगळा अनुभव देऊन जातात. (लेखक चित्रपटाचे समीक्षक आणि अभ्यासक आहेत.)

**आनंद सहस्रबुद्धे**

# इंदिरा गांधींच्या आयुष्यातून खूप काही शिकण्यासारखं!



महाराष्ट्रातला राजकारण आणि सत्ताकारणाविषयी सातत्याने बोलणाऱ्या अभिनेत्री कंगना राणावतच्या 'इमर्जन्सी' या आगामी हिंदी चित्रपटाविषयी प्रेक्षकांमध्ये मोठे कुतूहल आहे. माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या आयुष्यावर चित्रपट करण्याचा आणि त्यातही स्वत: मुख्य भूमिका साकारण्याची मनीषा कंगनामध्ये कुठून जागली? या प्रश्नाचं उत्तर नुकत्याच झालेल्या एका कार्यक्रमात तिने दिलं आहे. आणीबाणीच्या वेळी नेमकं काय घडलं होतं? हे जाणून घेण्याच्या इच्छेपोटी इंदिरा गांधी यांचं चरित्र वाचनात आलं. त्यांच्या आयुष्यात घडलेल्या घटनांमधून खूप काही शिकण्यासारखं आहे, असं सांगतानाच त्यांच्या जीवनप्रवासातूनच चित्रपटाची प्रेरणा मिळाली, असं कंगनाने स्पष्ट केलं.

या चित्रपटात तिच्याबरोबर अनुपम खेर, श्रेयस तळपदे, मिलिंद सोमण, महिमा चौधरी, सतीश कौशिक अशा अनेक नामांकित कलाकारांच्या भूमिका आहेत. कोणत्याही चित्रपटाचं प्रदर्शन अडथळ्यांविना होत नसतं, तिच्यासाठीही 'इमर्जन्सी' या चित्रपटाच्या निर्मितीचा प्रवास खचितच सोपा नव्हता, मात्र चित्रपटातील कलाकार आणि निर्मात्यांनी तिच्याबरोबर खंबीरपणे उभं राहात चित्रपट पूर्ण करण्यास सर्वतोपरी साहाय्य केलं, असं सांगत तिने आपल्या चित्रपटाच्या संपूर्ण चमूचे आभार मानले. पुपुल जयकर यांनी लिहिलेल्या 'इंदिरा गांधी : अ बायोग्राफी' या पुस्तकामुळे खूप प्रभावित झाल्याचं तिने सांगितलं. 'या पुस्तकात इंदिरा गांधी यांचा त्यांचे गुरू जे. कृष्णमूर्ती यांच्याबरोबर एक संवाद आहे. 'इंदिरा ही आणीबाणी योग्य नाही, तू हे थांबवलं पाहिजेस', असं त्यांच्या गुरूंनी त्यांना सांगितलं. त्या वेळी त्यांचं उत्तर देताना 'मी एका भयंकर अशा सैतानावर स्वार आहे, सुरुवातीला मला त्याचा आनंद वाटत होता पण आता जर मी त्यातून बाहेर पडले तर हा सैतान मला खाऊन टाकेल', असं सांगत एक प्रकारे आपणच घेतलेल्या निर्णयाच्या परिणामांपासून आपण आता वाचू शकणार नाही याची जाणीवच त्यांनी व्यक्त केली होती. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची ही बाजू एक कलाकार म्हणून मला शेक्सपिअरच्या शैलीतील शोकांतिकेशी साधर्म्य असलेली वाटली आणि मला त्यात चित्रपटाची कथा दिसली', असं कंगनाने सांगितलं. अनेकदा मोठ्या व्यक्ती आपल्या अहंकारामुळे किंवा आपलं म्हणणं खरं करण्याच्या नादात निर्णय घेतात वा एखाद्या गोष्टीत खोलवर घुसतात, मात्र त्या नादात घडून गेलेल्या चुकीची किंमत मोजल्याशिवाय त्यांना त्यातून बाहेर पडता येत नाही. असा सांगोपांग विचार करून कलाकृती निर्माण केल्याचे तिने सांगितले.हा चित्रपट ६ सप्टेंबरला देशभरात प्रदर्शित होणार आहे.



# सलमान खानने गायले 'रॅप साँग'

बॉलिवूडचा भाईजान म्हणजेच सलमान खान त्याच्या चित्रपटांमुळे चर्चेत असतो. याशिवाय त्याला चित्रकला आणि गाण्याचीही खूप आवड आहे. सलमान खानच्या गाण्याची झलक तुम्ही यापूर्वीच पाहिली असेल, काही काळापूर्वी सलमानने एका पेंटिंगमध्येही आपल्या हस्तकलेची झलक दाखवली होती. आता सलमान खान आणि त्याचा भाचा अग्नीच्या 'यू आर माइन' या गाण्याचा टीझर व्हिडिओ रिलीज झाला आहे. हे गाणे देखील खास आहे कारण या गाण्यात सलमान खान पहिल्यांदाच त्याचा भाचा अग्नी अग्निहोत्रीसोबत दिसणार आहे. सलमान खानने नुकताच 'यू आर माइन'चा एक व्हिडिओ शेअर केला आहे, ज्यामध्ये भाईजान त्याचा भाचा अग्निसोबत मस्ती करताना दिसत आहे. 'यू आर माईन' या गाण्याला सलमान खानने आपला आवाज दिला असून अग्निने त्यात रॅप केले आहे. या गाण्याचे बोल सलमान खान आणि संजीव चतुर्वेदी यांनी लिहिले आहेत. हे गाणे विशाल मिश्राने संगीतबद्ध केले आहे. अग्निने काही काळापूर्वी त्याचे आणखी एक गाणे आणि म्युझिक व्हिडिओ पार्टी फिव्हर रिलीज केला होता. पायल देवसोबत अग्निने हे गाणे गायले आहे. सलमान खानच्या वर्क फ्रंटबद्दल बोलायचे झाले तर, सलमान खानचा पुढचा चित्रपट सिकंदर आहे. सिकंदर पुढील वर्षी म्हणजेच २०२५ मध्ये ईदच्या मुहूर्तावर प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटात रश्मिका मंदान्नासोबत सलमान खान दिसणार आहे.



# खाकी : द बंगाल चॅप्टर'मध्ये चित्रांगदा

अभिनेत्री चित्रांगदा सिंह अलिकडेच एका चित्रपटातील गाण्यात दिसून आली होती. आता चित्रांगदा लवकरच वेबसीरिज 'खाकी : द बंगाल चॅप्टर'मध्ये काम करणार आहे. या वेबसीरिजची निर्मिती नीरज पांडे करणार आहे. खाकी : द चॅप्टर ही सीरिज 'खाकी : द बिहार चॅप्टर'चा पुढील भाग असेल. पहिला सीझन २०२२ मध्ये प्रदर्शित झाला होता. यात निकिता दत्ता, अविनाश तिवारी, आशुतोष राणा, ऐश्वर्या सुष्मिता समवेत अनेक कलाकार दिसून आले हेते. नीरज पांडे यांच्या वेबसीरिजसाठी मी अत्यंत उत्सुक आहे. सध्या याचे चित्रिकरण सुरू आहे. लवकरच मी आणखी एका चित्रपटात दिसून येणार आहे. याचबरोबर एका प्रोजेक्टसाठी चर्चा सुरू असल्याचे चित्रांगदाने सांगितले आहे. चित्रांगदा यापूर्वी 'गॅसलाइट' चित्रपटात दिसून आली होती. यात विक्रांत मैसी आणि सारा अली खान यांनीही काम केले होते. चित्रांगदाने यापूर्वी बॉब बिस्वास, आय मी और मैं, ये साली जिंदगी, हजारो ख्वाहिशें ऐसी, इंकार, साहेब बीबी और गँगस्टर ३ आणि बाजार समवेत काही चित्रपटांमध्ये



# श्वेताच्या फिटनेसवर सलमान फिदा

दबंग अभिनेता सलमान खान जेव्हा कोणाची स्तुती करतो तेव्हा त्या कलाकाराची चर्चा सर्वत्र होत असते. मित्रांचा मित्र म्हटला जाणारा सलमान अनेकदा त्याच्या जुन्या गोष्टींमुळे चर्चेत असतो. सुपरस्टारच्या आगामी प्रोजेक्ट्सवरही चाहत्यांची नजर असते. सध्या भाईजान 'सिकंदर'च्या शूटिंगमध्ये बिझी आहे. हा चित्रपट सलमानसाठी अनेक अर्थांनी खास आहे. 'सिकंदर'मध्ये सलमान खानचा जबरदस्त अॅक्शन अवतार पाहायला मिळणार आहे. अशात आता सलमानचा एक जुना व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या व्हिडिओत त्याच्यासोबत टॉप टीव्ही अभिनेत्री श्वेता तिवारीही दिसत आहे. अभिनेत्री श्वेता तिवारीनेही बिग बॉस सीझन ४ मध्ये भाग घेतला होता. तिचा हा सीझनही प्रेक्षकांना खूप आवडला होता. आपल्या प्रसिद्ध टीव्ही शो 'कसौटी जिंदगी की' द्वारे घराघरात छाप पाडणाऱ्या श्वेताची फॅन फॉलोइंगही कमालीची होती. अशात हा शो जिंकण्यात तिला फारशी अडचण आली नाही. पण शोच्या सुरुवातीला जेव्हा श्वेता स्टेजवर पोहोचली तेव्हा सलमान खानही तिच्या सौंदर्यावर फिदा झाला आहे. एक क्षण असा आला जेव्हा सलमानला तिच्यावरून नजर हटवता येत नव्हती. व्हायरल होत असलेल्या व्हिडीओमध्ये श्वेता तिवारी तिच्या ऍब्सचे व्यायाम स्पष्ट करताना दिसत आहे. मात्र, तिची व्यायाम करण्याची पद्धत खूपच वेगळी होती. अभिनेत्री तिच्या ब्सचा व्यायाम डान्स स्टेप्सप्रमाणे करते. श्वेताची स्टाईल पाहून सलमान तिच्याकडे रोखून बघत राहतो. भाईजानच्या चेहऱ्यावर मोठे हास्य आहे. सलमान म्हणतो, बरं, तू हे खूप छान केलं आहेस. तू काय केलेस ते मला पुन्हा एकदा दाखव. मलाच नाही तर संपूर्ण भारताला बघायचे आहे. असं म्हणत तो तिचे कौतुक करतो. सध्या हा व्हिडिओ चांगलाच व्हायरल होत आहे.